नि.दि.दा. क्र.१४०००२७/२००९
निशाणी क्रमांक – ८० खाली

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २</u>

<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. व्ही. गजभिये यांच्यामार्फत</u> :-

८) श्रीराम खेडकर यांची शेती मी पाहिली आहे. त्यांच्याकडे ९-१० एकर शेती होती परंतु नेमकी मला माहित नाही. त्यांच्याकडे एक शेती होती. श्रीराम यांची शेती सध्या त्यांचा मुलगा देवराव याच्याकडे आहे. श्रीराम यांना भाऊराव नावाचा दुसरा मुलगा आहे. हे मला माहित नाही की, देवरावकडे जी शेती आहे ते श्रीराम यांनी बटवारा करुन देवरावला दिली किंवा कसे. श्रीराम यांना एक घर व एक गाईचा गोठा होता. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम यांनी गाईच्या गोठयात नवीन घर बांधले होते. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम त्यांच्या पत्नीसोबत देवरावपासून वेगळे गोठयात राहत होते.

९) श्रीराम यांची मृत्यु जुन्या घरी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, श्रीराम यांच्याकडे शेती व्यतिरिक्त इतर कोणते व्यवसाय नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, देवराव शेती करत होता व भाऊराव नोकरी करत होता. हे म्हणणे खरे आहे की, देवराव यांचा मुलगा महावीर हा ट्रॅक्ट्रर लावून शेती करत होता व आता ती शेती बटाईने दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीराम यांची मृत्युनंतर लक्ष्मीबाई बरेच वेळ मुसेवाडी येथे एकटी राहिली. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मीबाई ज्या घरात राहत होती त्याच्या समोर रोड आहे व त्याच्या पूर्वे दिशेला अखाडू बरबटे यांचे घर, तसेच पश्चिम दिशेला परसराम झाडे यांचे घर, तसेच उत्तर दिशेला प्रेमचंद झाडे यांचे घर, तसेच दक्षिण दिशेला परसराम झाडे यांची शेती आहे.

१०) लक्ष्मीबाई ज्या घरात राहत होती त्याचे क्षेत्रफळ ३० X ७० होते किंवा किती होते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मीबाई ज्या घरात राहत होती ते घर मातीची भिंत व कवेलूचे छतचे होते. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मी बाईने मुसेवाडी येथील घर प्रतिवादी क्र.२ शामराव यांना विकले. हे म्हणणे खरे आहे की, मुसेवाडी येथील देवराव

राहत असलेले घर व लक्ष्मीबाई राहत असलेले घर श्रीरामने बांधले होते. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम यांच्याकडे दोन शेत होते. हे मला माहित नाही की, श्रीराम जिवंत असतांना त्यांनी दोन्ही घर व दोन्ही शेतीची वाटणी केली होती किंवा कसे.

११) हे मला माहित नाही की, लक्ष्मीबाई यांनी शामराव यांना विकलेल्या घराचा कब्जा शामरावला दिला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.३ ते ६ मधील मजकूर वादीच्या सांगण्यावरुन खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, लक्षमीबाई ज्या घरात राहत होती त्या घराशी महावीर व देवराव यांचा काही मालकी संबंध नाही.

१२) हे म्हणणे खरे आहे की, देवराव ज्या घरात राहत होता ते घर आता महावीरच्या कब्जात आहे. महावीरला दोन बहिणी आहे.हे म्हणणे खरे आहे की, जे घर आता महावीरच्या कब्जात आहे ते पूर्वी श्रीरामच्ययया मालकीचा होता. हे म्हणणे खरे आहे की, देवराव जिवंत असतांना त्याचा श्रीराम व त्याच्या पत्नीसोबत शेती व घराविषयी कधी वाद झाला नव्हता. हे मला माहित नाही की, श्रीराम याने दोन्ही घर व दोन्ही शेतीची वाटणी करुन दिली म्हणून त्यांचे वाद झाले नाही किंवा कसे.

१३) हे म्हणणे खरे नाही की, देवराव याचे लग्न झाल्यावर गोठा असलेले घराची दुरुस्ती केली हे मी वादीच्या सांगण्यावरुन खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, देवराव त्यांच्या पत्नीसोबत गोठयाच्या घरात राहण्यास गेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम मेल्यानंतर लक्ष्मीबाईला देवराव किंवा त्याचा मुलगा मदत करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम जीवंत असतांना सुध्दा देवराव व त्यांचा मुलगा लक्ष्मीबाईला मदत करत नव्हता.

१४) हे म्हणणे खरे नाही की, जुन्या घराच्या अंगणात व छपरीत देवराव व महावीर शेतीचे अवजारे व धान्य वगैरे ठेवत असत व आतासुध्दा ठेवतात हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहित नाही की, लक्ष्मीबाई ज्या घरात राहत होती ते तिला श्रीराम यांनी बटवाऱ्यात दिले होते. माझे महावीरसोबत चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, शामराव सोबत माझे बोलचाल नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.८० माझे शपथवरील

माझे शपथपत्र महावरी याच्या सांगण्यावरुन तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी महावीरच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

रामटेक.
**(श्रीमती डी. सी. वोराणी)**

दिनांक - २९/०१/२०२६.
२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
रामटेक.